# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५
## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ४ )**

**(१) सर्वश्री. संतोष दानवे, नारायण कुचे, सुधीर मुनगंटीवार, बबनराव यादव (लोणीकर), वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जालना जिल्ह्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीपोटी शेतकऱ्यांना द्यावयाच्या अनुदान वितरणात तब्बल ४२ कोटींचा अपहार होणे, अंबड व घनसावंगी तालुक्यात बनावट लाभार्थी, शासकीय व लागवडीखाली नसलेल्या जमिनी, एकाच नावावर दुबार अनुदान आणि अधिकारपत्रांचा गैरवापर करून हा घोटाळा करण्यात आलेला असणे, यामध्ये तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, वरिष्ठ लिपिक अशा किमान ७४ अधिकाऱ्यांचा सहभाग उघड होऊन २१ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले असणे, आतापर्यंत ५.७६ कोटींची वसुली झाली असली तरी चौकशी सुरूच असून प्रकरणाची व्याप्ती १०० कोटी पर्यंत आढळण्याची शक्यता असणे, या प्रकरणामुळे शासन योजनांवरील शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत झाला असून संतापाची भावना तीव्र होत असणे, अशा गंभीर गैरव्यवहारामुळे योजनांची पारदर्शकता, प्रशासकीय नीतिमत्ता आणि सार्वजनिक संसाधनांवरील नियंत्रण धोक्यात येण्याची शक्यता असणे, यामुळे शासनाने दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असणे, अशा आपत्ती अनुदान वितरण करण्यासाठी एकसंध व पारदर्शक ऑनलाईन पोर्टल तयार करून त्याद्वारे मदतीचे अर्ज, प्रमाणपत्र, मंजुरी व वितरण या साऱ्या प्रक्रिया राबविणेसाठी करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. राजेश पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कंधार, बिलोली, नायगाव व मुखेड (जि. नांदेड) तालुक्यात दिनांक १ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत शेतकऱ्यांसाठी सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येणे, सदर योजना राबविताना तत्कालिन कृषी पर्यवेक्षक यांनी योजनेतील वितरित ठिंबक व तुषार सिंचनाचे मार्गदर्शक सूचनांची तपासणी न करता खाजगी

वितरकांसोबत संगनमत करुन बनावट दस्ताऐवज कृषी कार्यालयात दाखल करुन शासनाचे ५ कोटी ९८ लाख रुपयांचा अपहार केल्याची घटना माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असणे, याप्रकरणी जिल्हा कृषी कार्यालयातील तंत्र अधिकारी यांनी कृषी पर्यवेक्षक व इतर कृषी वितरक यांचे विरुध्द गुन्ह्याची तक्रार दाखल केली असणे, सदर फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात कृषी पर्यवेक्षक व इतर कृषी वितरक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करुनही अद्यापपर्यंत दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी चौकशी करुन दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर कडक कारवाई करण्याची माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली असणे, याबाबत शासनाने सुक्ष्म सिंचन योजनेत बनावट दस्ताऐवज दाखल करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या दोषींकडून अपहाराची रक्कम वसूल करुन दोषींवर करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. राजेश विटेकर, अस्लम शेख, अमीन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. विकास ठाकरे, संजय मेश्राम, अमित झनक, काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पिक विमा कंपनीने परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदतीपासून वंचित ठेवणे, हवामानातील प्रतिकूल परिस्थिती, Event Break च्या तक्रारी ग्राह्य न धरणे, स्थानिक नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या याद्या कार्यालयास सादर न करणे, दिनांक १९ व २० ऑगस्ट, १९ व २० सप्टेंबर तसेच १९ व २० ऑक्टोबर रोजी झालेल्या पावसाबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारी कंपनीने मान्य न करणे, काढणी पश्चात व पीक कापणी प्रयोग आधारित पिक विमा वाटपास विलंब, पीक नुकसानीच्या नाकारलेल्या व स्वीकारलेल्या तक्रारींची यादी, विविध मुद्यांवरून जिल्हाधिकारी परभणी यांनी दिनांक ७ मे, २०२५ दरम्यान घेतलेल्या बैठकीत सदरील विमा कंपनीस आदेशित करूनही त्या सर्व मुद्यांची सोडवणूक न होणे, पीक कापणी प्रयोगात कमी उत्पन्न आलेले असतानाही पीक कंपनीने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे आक्षेप दाखल करून वेळकाढूपणाचे धोरण राबवणे, शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणे, ही दिरंगाई व बनवाबनवी लक्षात घेऊन कृषी मंत्री यांनी पुणे येथील कृषी आयुक्त, कृषी संचालक, व जिल्हाधिकारी परभणी यांनी लक्ष घालून तात्काळ कारवाई करावी असे आदेश ४ जून, २०२४ दरम्यान कृषी मंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत दिलेले असणे, मात्र कृषी आयुक्त स्तरावरून कोणतीही अंतिम कार्यवाही न होणे, शासनाने त्यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) सर्वश्री. रोहित पाटील, हेमंत ओगले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मागील २ वर्षापासून मे महिन्यात झालेल्या व सलग होत असलेल्या अवकाळी मान्सूनपूर्व पावसामुळे द्राक्ष पिकावर मोठा परिणाम झाला असणे, खरड छाटणीनंतर काडी निर्मिती, गर्भधारणा व फळधारणेचा अत्यंत संवेदनशील टप्पा असणे, याच काळात अनेक भागांमध्ये २५० ते ४०० मिमी पावसाने हजेरी लावल्यामुळे द्राक्ष पिकांमध्ये घडांची

गुणवत्ता, फळाची गर्भधारणा आणि उत्पादनावर नकारात्मक परिणाम झाला असणे, अश्या अवकळी पावसामुळे रोगराई व किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असणे, फळांच्या आकारमानावर व द्राक्षांच्या दाण्यांवर प्रत्यक्ष फटका बसलेला असणे, संवेदनशील कालावधीमध्ये शेतकऱ्यांचे रसायने, इंधन, मजुरी खर्च करत असून पावसामुळे हा सर्व झालेला खर्च वाया जाणे, एकरी अंदाजे १५ ते २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे असणे, दरवर्षी मे महिन्यात अशा प्रकारच्या हवामान बदलामुळे द्राक्ष उत्पादक अडचणीत सापडणे व अश्या परिस्थितीचा द्राक्ष शेतीवर मोठा परिणाम होत असणे, त्यामुळे शासनाने हवामान बदलाचा अभ्यास करून या संकटाचा कायमस्वरूपी उपाय काढणे गरजेचे असणे, या परिस्थितीत शासनाने नुकसानग्रस्त द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी केलेली कार्यवाही आणि याबाबत शासनाची अधिकृत भूमिका."

**(५) श्री.नितीन पवार, श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"देशातील प्रत्येक कुटुंबाला स्वतःचे पक्के घर परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना ही महत्वकांक्षी योजना सुरु केलेली असणे, राज्यातील महानगरांमधील वाढत असलेली लोकसंख्या व त्यानुषंगाने वाढत असलेली घरांची गरज याचा ताळमेळ घालण्यासाठी १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ९ महानगरांमध्ये राज्य शासनाकडून दिनांक ८ नोव्हेंबर, २०१३ पासून सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना सुरु करण्यात आली असणे, नाशिक शहरात सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीरित्या होत नसल्याने दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या उपस्थितीत म्हाडा व महानगरपालिका नाशिक या विभागांची संयुक्त बैठक घेऊन नाशिक शहरात सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी म्हाडा कार्यालयाची NOC घेण्याबाबत सुचना प्रदान केलेल्या असणे, या निवेदनात उप मुख्यमंत्री यांनी दिनांक २९ मार्च, २०२२ च्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याचे आदेश म्हाडा व महानगरपालिका, नाशिक यांना दिल्याचे आश्वासन देणे, परंतु सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व शासन यांनी दिलेल्या आदेशाच्या विपरीत दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांनी त्यांचे नगररचना विभागास उपरोक्त निर्देशांचे पालन करण्याची आवश्यकता नसल्याच्या आशयाचे परिपत्रक जारी केलेले असणे, महानगरपालिकेच्या चुकीच्या धोरणामुळे अनेक गरीब व गरजू नागरिकांना घरकुल मिळण्यात अडचणी निर्माण होणे, गोरगरिबांच्या घरकुलांमध्ये नाशिक महानगरपालिकेत सुरू असणारा भ्रष्टाचार, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये असणारी असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६) श्री. हिकमत उढाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत सुमारे १८,००० पदांकरिता अंगणवाडी मुख्यसेविका / मदतनीस भरती प्रकिया राबविली असणे, घनसावंगी तालुक्यातील (जि. जालना) येथील अंगणवाडी मुख्यसेविका / मदतनीस भरती प्रकियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता तसेच आर्थिक गैरव्यवहार अनेक तक्रारी लोकप्रतिनिधींकडे प्राप्त होणे, तालुक्यातील महिला बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी अपात्र असलेल्या उमेदवारांना बनावट कागदपत्रांच्या आधारे खोटे दस्तावेज सादर करुन असंविधानिक मार्गाने भरती प्रक्रिया राबविली असणे, अपात्र महिला उमेदवारांकडून आर्थिक गैरफायदा करुन भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करणे, संबंधित पात्र केलेल्या महिला उमेदवारांच्या अर्जामध्ये तांत्रिक त्रुटी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी त्या अर्जात खाडाखोड असताना देखील त्यांचे अर्ज अपात्र न करता त्यांना नियुक्ती पत्र वितरीत केले असणे, संबंधित आर्थिक गैरव्यवहाराबाबतीत वारंवार तक्रारी प्राप्त होऊन देखील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई अद्याप शासनामार्फत करण्यात येत नसणे, यासंबंधी गैरव्यवहाराबाबत तेथील महिलांनी उपोषण करण्याची मागणी केलेली असणे, शासनाची दिशाभूल करुन तालुक्यातील अंगणवाडी मुख्यसेविका / मदतनीस भरती प्रकियेत आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करुन अपात्र केलेल्या महिलांना न्याय मिळण्यासाठी याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रताप अडसड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने गाईंना राज्य मातेचा दर्जा दिला असणे, राज्यात रोजगार हमी योजने अंतर्गत जनावरांसाठी गोठा बांधण्यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये राज्यातील नोंदणीकृत गोशाळांना समाविष्ट करण्याची मागणी गोपालक व लोकप्रतिनिधींकडून होत असणे, राज्य शासनाने गायींना राज्य मातेचा दर्जा दिला त्याप्रमाणे या गोशाळेचा समावेश रोजगार हमी योजनेत करून त्यांना प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत शेतकऱ्यांना गुरांच्या संख्येवर आधारित सुरु असलेल्या योजनेत समावेश करावा व त्यास निधी देण्याची आवश्यकता असणे, राज्यात अनेक गोशाळा सुरू असून त्या ठिकाणी वृद्ध, अपंग, अंध आणि भाकड गोवंश सांभाळल्या जात असणे, त्यामुळे अनेक गोशाळांमध्ये भाकड गाई असून त्यांच्या निवाऱ्यासाठी गुरांच्या संख्येवर आधारित गोठा बांधण्यासाठी अनुदान दिले तर या गोमातांच्या निवाऱ्याचा प्रश्न बऱ्यापैकी सुटणार असणे, तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रत्येक पंचायत समितीद्वारे सुरु असलेल्या योजनेत समावेश करून किमान पाच लाख रुपयापर्यंत अनुदान दिल्यास अनेक गोमातांचे आणि गोवंशाचे पालन पोषण करण्यास सुलभ जाणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** :

**(क)** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** :

शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सदुसष्ठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा.६) याच्या कलम ३ (६) (ख) (चार) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार "वारणा विद्यापीठ, वारणानगर, कोल्हापूर" या समूह विद्यापीठाची स्थापना करण्याबाबतची प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३६/विशि-४, दिनांक १५ मे, २०२५ सभागृहासमोर ठेवतील.

(४) **माजी सैनिक कल्याण मंत्री** : महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : औचित्याचे मुद्दे**

**पाच : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शिक्षण उपसंचालक, संदीप सांगवे यांनी दिलेल्या शालार्थ आयडीत व शिक्षण समायोजनात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी विविध शिक्षक संघटना करीत असणे, तसेच उपसंचालक मुंबई कार्यालयाकडून शालार्थ आयडी साठी आलेल्या फाईल अनेक वर्षे पेंडिंग ठेऊन पुन्हा निकाली काढण्यात येत असल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असल्याची शंका निर्माण होणे, मुंबई उपसंचालक कार्यालयाने शालार्थ आयडी फाईलचा क्र. व प्रत्यक्ष शालार्थ आयडीला दिलेली तारीख, प्रत्यक्षात उपसंचालक कार्यालयाने त्या शाळेला केलेला मेल याची तपासणी करणे आवश्यक असणे, त्यामुळे बॅक डेटेड तारखेला केलेला मेल आयडी तसेच शिक्षकाला प्रत्यक्ष मिळालेले वेतन याची तपासणी आवश्यक असणे, मुंबईत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना शिक्षण उपसंचालकाने शिक्षक अधिकाऱ्यांना पत्र देऊन नियम डावलून सेवाज्येष्ठता देऊन समायोजन केल्याने अर्थपूर्ण व्यवहार झाल्याची शंका निर्माण होत असणे, मुंबईतील काही शिक्षकांचे समायोजन बाहेर करून वेतन बंद केले जात असून काही शिक्षकांचे पगार सुरू ठेवले जात असल्याने मागील दोन वर्षातील आत्तापर्यंत केलेल्या सर्व समायोजनाची तपासणी करून मुंबईतील रात्र शाळेबाबतही शासनाने धोरण

ठरवण्यासाठी समिती नेमणे, मात्र या समितीचाही अहवाल आलेला नसताना शिक्षण उपसंचालकाने स्वतःच धोरण निश्चित करून नियुक्त करणे, या व अन्य समस्यांमुळे मुंबई उपसंचालक कार्यालयाकडून मागील दोन वर्षात केलेल्या सर्व शालार्थ आयडी देण्याची सखोल चौकशी करण्याची मागणी मुंबईतील शिक्षक आणि लोकप्रतिनिधींकडून होत असणे, राज्यातील इतर विभागात शालार्थ आयडीची एसआयटीमार्फत चौकशी सुरू करण्याची मागणी होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. सिध्दार्थ शिरोळे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. भिमराव तापकीर, अमित विलासराव देशमुख, विकास ठाकरे, संजय मेश्राम वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरामध्ये सायबर गुन्ह्यांमधील वाढती संख्या आणि प्रलंबित प्रकरणे लक्षात घेता शहरातील सध्याचे एकमेव सायबर पोलीस ठाणे हे अपुरे पडत असणे, पुणे शहरात २०२२ मध्ये १०६९२ सायबर गुन्ह्यांची नोंद होणे, २०२३ मध्ये ही संख्या ११९७४ होणे, तर २०२४ मध्ये तब्बल १३००० गुन्ह्यांची नोंद होणे, तसेच ३ वर्षात ३० टक्क्यांनी गुन्ह्यांमध्ये वाढ होणे, तसेच तीन वर्षात यापैकी केवळ ४२ टक्के सायबर गुन्ह्यांचा रिटर्न ऑफ प्रॉपर्टीचा न्यायालयीन निकाल लागलेला असून उर्वरित प्रकरणे अद्याप प्रलंबित असून, सदर प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टामार्फत चालवण्याची गरज असणे, पुणे शहराला पाचही विभागांमध्ये नवीन सायबर पोलीस ठाणे करणे गरजेचे असणे, सायबर चोरटे वेगवेगळ्या नाविन्यपूर्ण पद्धतिने फसवणूक करणे, त्यामध्ये जेष्ठ नागरिकांचा व सुशिक्षित नागरिकांचा जास्त समावेश असणे, पोलीस ठाण्यांमध्ये आय टी मध्ये परीक्षण असलेला स्टाफ नसणे, नागरिकांमध्ये सायबर चोरट्यांच्या नवीन पद्धतींबद्दल शासनाकडून प्रबोधन नसणे, म्यूल अकाउंट आणि व्ही पी एन नेटवर्क शोधण्याचे तंत्रज्ञान नसणे, सेंटर ऑफ एक्सलन्स इन डिजिटल फॉरेन्सिक अधिक सक्षम करण्याची गरज असणे, शालेय अभ्यासक्रमामध्ये सायबर क्राईम बद्दल प्रबोधन करण्याची गरज व पुणे शहराला पाचही विभागांमध्ये नवीन सायबर पोलीस ठाणे करण्याची होत असल्याची मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. हेमंत रासने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनामार्फत २०२३ मध्ये विविध शासकीय विभागांमध्ये लिपिक व टंकलेखक या पदासाठी लेखी परिक्षा व कौशल्य चाचणी होऊनही अद्यापही निकाल जाहिर करण्यात न येणे, सदर निकाल जाहिर करण्यास शासनाने ठरवलेली निश्चित कालमर्यादा नसल्याने होणा-या विलंबामुळे उमेदवारांना मानसिक व आर्थिक ताणाला सामोरे जावे लागणे, परिणामी उमेदवारांमध्ये तसेच त्यांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने सदर परिक्षेचा निकाल जाहिर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(४) श्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात आलेल्या इमारतींमधील अनेक इमारतींचे विकासकाने भोगवाटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त केले नसल्याची बाब निदर्शनास येणे, सदरहू भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या इमारतींना महानगरपालिका तसेच इतर शासकीय प्राधिकरणांमार्फत नागरी सुविधा मिळण्याकरिता खुपच अडचणींचा सामना करावा लागत असणे, त्याचप्रमाणे महापालिकेकडून अशा इमारतींना शास्तीची घरपट्टी लागत असल्याने रहिवाश्यांना अधिकचा भुर्दंड सोसावा लागत असून परिणामी सदरहू इमारती अनधिकृत घोषित होण्याची शक्यता निर्माण होणे, बहुतांश विकासक इमारतींचे बांधकाम नियमानुसार पूर्ण करत नसल्यामुळे देखील अनेक इमारतींना भोगवाटा प्रमाणपत्र मिळत नसल्याची बाब समोर येणे, महापालिका क्षेत्रातील एकाच विकासकाने तसेच त्याच्या अन्य भागीदारी कंपन्यांकडून ८९ इमारतीचे बांधकाम पूर्ण करूनसुद्धा भोगवाटा प्रमाणपत्र न घेतल्यामुळे अंदाजे ४५ कोटींपेक्षा अधिक रकमेचे महापालिकेचे महसूल बुडाले असल्याची बाब आढळून येणे, या इमारतींमधील रहिवाश्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच महापालिकेचा बुडालेला महसूल वसूल करण्यासाठी ज्या विकासकांनी बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींकरीता भोगवाटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले नसल्यास संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई होण्याकरिता महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतूद अंर्तभूत करण्यासाठी शासनाने काही ठोस भूमिका घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(५) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अंबाजोगाई, केज शहर व परिसरातील नागरिकांना मागील १५ ते २० वर्षापासून अल्प व खंडीत पर्जन्यमानामुळे सातत्याने तीव्र पाणी टंचाईस तोंड द्यावे लागत असणे, मांजरा प्रकल्पस्थळी पाणी येण्यात तूट असल्यामुळे प्रकल्प दरवर्षी पूर्ण क्षमतेने भरत नसणे, तसेच या परिसरातील अनिश्चित पर्जन्यमानामुळे दर २ ते ३ वर्षांनी दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे व पाणीपुरवठा योजनेवर गंभीर परिणाम होत असणे, सन २०१६ मध्ये भीषण परिस्थिती निर्माण होऊन मांजरा प्रकल्प पूर्णपणे कोरडा पडणे, इतर योजनेमध्येही पाणी नसल्यामुळे परिसरातील शहरी व ग्रामीण भागास पिण्याच्या पाणी पुरवठ्याकरिता सातत्याने टंचाईस तोंड द्यावे लागत असणे, तसेच जलाशयातील पाण्याच्या तुटीमुळे लाभक्षेत्रातील शेतकरी सिंचनापासून वंचीत राहत असणे, त्यामुळे टंचाईग्रस्त अंबाजोगाई , केज शहर व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची शाश्वत सोय उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मध्य गोदावरी खोऱ्यात अनुज्ञेय केलेल्या १९.२९ अघफू पाण्यामधून पेयजलाच्या आपुर्तीसाठी मांजरा प्रकल्पात २ ते ३ अघफू पाणी

उपलब्ध करून देऊन मांजरा प्रकल्पाचे स्थैर्यिकरण या स्वतंत्र योजनेसाठी विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(६) श्री. राघवेंद्र पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धुळे जिल्ह्यातील धुळे तालुका हा अवर्षण प्रवण क्षेत्र असून पाण्याअभावी बहुतांश शेतकरी केवळ पावसाळी पिकावर अवलंबून असणे, धुळे तालुक्यातील अंबोडे, नंदाळे खुर्द, नगाव खुर्द, भिरदई, मुकटी, भिरदाने, सावळी, चिंचखेडे, अचंदे तांडा, अजंग, वणी बु,अरणी, सावळी तांडा, नवलनगर, कासविहीर, नावरा, नावरी, सातरणे, मोहाडी प्रा, विश्वनाथ, वडगाव, अंचाळे, वजीरखेडे, अंदड, मलाणे, फागणे, कलखेडे इ. गावे पाण्यापासून वंचित असणे, येथील गावांमध्ये कुठल्याही सिंचन योजना अस्तित्वात नसून सदर भाग हा राष्ट्रीय महामार्ग ६ ला लागून असून देखील सिंचन सुविधा नसल्याने मागे राहिला असणे, सदर भागात नार-पार-गिरणा योजनेच्या माध्यमाने गिरणा धरणातून २.८. टी.एम.सी.पाणी उपसा सिंचन योजनेमार्फत उपलब्ध केल्यास जवळपास १२००० हे.क्षेत्र सिंचनाखाली येणे शक्य होणार असणे, तसेच धुळे तालुक्यातील बोरी नदी व गिरणा नदी मधील मौजे मोरदड, खोरदड, चांदे, सिताने, शिरूड, मोरदड तांडा, खोरदड तांडा, तरवाडे, नाणे, नंदाळे, धामणगाव हा पट्टा अत्यंत दुष्काळग्रस्त असणे, सदर भागात गिरणा नदीवरील पांझण डावा कालव्याच्या काही वितरीका असणे, पांझण डावाकालवा वाढ व विस्तार अंतर्गत काही गावांमध्ये कामे देखील पूर्ण होणे, परंतु सदर कालव्यावरील क्षेत्रास गिरणा धरणाच्या मूळ प्रकल्प अहवालात पाणी तरतूद नसल्यामुळे पाणी उपलब्ध होत नसणे, महाराष्ट्र शासनाद्वारे सिंचन सुविधा निर्माण होऊन देखील शेतकरी पाण्यापासून वंचित असणे, सदर भागास गिरणा धरणातून शाश्वत ०.७ टी.एम.सी. पाणी मिळाल्यास अंदाजे ३००० हे. क्षेत्र सिंचनाखाली येणे शक्य होणार असणे, नार-पार-गिरणा वळण योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यातून धुळे तालुक्याकरीता ठोस २.८+०.७=३.५ टी.एम.सी. पाण्याची तरतूद करण्यात यावी व शेतकऱ्यांना नियमित व हमीचे पाणी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.सुहास कांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मनमाड शहराच्या मध्यवर्ती भागातून पुणे-इंदूर व नाशिक-जळगाव हे प्रमुख महामार्ग तसेच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, धुळे व शिर्डीकडे जाण्यासाठी असलेले मार्ग असणे, या मार्गाच्या दोन्ही बाजूंना घनदाट वस्ती व महत्वाची शासकीय आणि व्यापारी कार्यालये तसेच शाळा, महाविद्यालये, बँका, बाजारपेठा, दवाखाने इत्यादी असणे, त्यामुळे सदर ठिकाणी नियमित वर्दळ सुरु असणे, महामार्गावर पर्यायी उड्डाणपूल उभारण्यात आलेला नसल्यामुळे दोन्ही भागांतील नागरिक व विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत घेऊन महामार्ग ओलांडावा लागणे, तसेच महामार्गावर मोकाट

जनावरे कायमच रस्ता अडवून बसलेली असल्याने वारंवार अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागणे, तसेच मनमाड शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होणे, त्यामुळे वाहनचालक, प्रवाशी यांना नाहक त्रास सहन करावा लागणे, मनमाड व नांदगाव बाह्यवळण रस्त्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे करण्यात येणे, तथापि अद्याप कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी स्थानिक नागरीकांसह प्रवाश्यांमध्ये वाढते तीव्र असंतोषाचे वातावरण, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन मनमाड येथील पुणे-इंदूर महामार्गासाठी पर्यायी उड्डाणपूल आणि बाह्यवळण रस्ता करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयक :-**

**संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४.

**आठ : (बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, नितीन देशमुख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संजय पोतनीस, बापूसाहेब पठारे, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, अभिजीत पाटील, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, संदिप क्षिरसागर, नारायण पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर, बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याचे कृषी मंत्री सिन्नर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना त्यांनी" ढेकळांचे पंचनामे करायचे का ?" असे शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे केलेले वक्तव्य, जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदार संघात" हर घर सौर" योजनेवरील एका कार्यक्रमात सत्तारुढ पक्षाच्या एका विधीमंडळ सदस्याने " आपल्यामुळे कपडे, बुट, मोबाईल योजनांचे आर्थिक फायदे आणि पेरणी करण्यासाठी पैसे मिळतात" असे शेतकऱ्यांना उद्देशून उद्‌गार काढणे, मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील सर्वच भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार झालेला पाऊस, त्यामुळे अनेक जिल्हयात निर्माण झालेली पूरपरिस्थिती, नद्यांचे पाणी पात्राबाहेर जाणे, अनेक ठिकाणी दरडी कोसळून विस्कळीत झालेली वाहतूक, केळी, पेरु, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळपिकांचे झालेले मोठे नुकसान,

राज्य सरकारने नुकसानीबाबत पंचनामे त्वरित करणे व शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटपात विविध जिल्ह्यात झालेले भ्रष्टाचार, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे झालेले नुकसान, दरवर्षी मे, महिन्यात कोकणात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु यावर्षी अतिवृष्टीमुळे पर्यटकांची संख्या कमी होणे व पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या पर्यटन व्यावसायिकांचे झालेले अतोनात नुकसान, दरवर्षी कोकणात साधारणपणे २३ मे पासून भात आणि नागलीची पेरणी सुरु होते, परंतु यावर्षी १५ मे पासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे पेरणी पूर्वीची कामे न होणे, तसेच रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांच्या कापणीची कामे सुरु असतांनाच पाऊस सुरु झाल्याने भात मातीत मिसळून पूर्णपणे वाया जाणे, कोकणातील सदरहू परिस्थिती पाहता कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता शासनाने विशेष मदतीचे पॅकेज जाहीर करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची आवश्यकता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, राज्य शासनाने कृषि क्षेत्राला अग्रेसर ठेवण्यासाठी महाॲग्रो एआय धोरणास (२०२५ ते २०२९) शासनाने दिलेली मंजूरी, एका रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, शेतकऱ्यांना कृषी विम्याची रक्कम दिली जात नसून विमा कंपन्यांना कृषि विम्याचा लाभ झाला असणे, संपूर्ण राज्यात बोगस बीटी बियाण्याचा धुमाकूळ सुरु असून यावर्षी बोगस बीटी बियाणे ३० टक्क्यापेक्षा जास्त विकले गेल्याची बाब निदर्शनास येणे, बिटी बियाणांची बिनधास्त विक्री सुरु असून त्यांचे बिंग फुटू नये म्हणून बियाणे लेबलविना, खुल्या पाकिटमध्ये विकले जात असणे, शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा निवडणूकी अगोदर केली असून अद्यापही सरसकट कर्जमाफीची घोषणा न करणे, कापसाच्या पालवीवर वाणी नावाचा रोग आला असून त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाचे पैसेही अद्याप मिळालेले नसणे, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भ व मराठवाड्यातील २६७ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बऱ्याच कुटुंबियांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, विदर्भातून गोव्याला जाण्यासाठी ८६ हजार कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग करण्याची आखलेली योजना, वास्तविक पाहता या अंतर्गत असलेल्या मंदिरांकडे जाण्यासाठी तयार असलेल्या उत्तम रस्त्यांचे जाळे, शक्तिपीठ महामार्गामध्ये १२ जिल्ह्यातील शेतकरी बाधित होणार असल्याने दि.१.७.२०२५ पासून १२ जिल्ह्यात व संपूर्ण महाराष्ट्रात रास्तारोको आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काढून घेण्यात येणाऱ्या सुपिक जमिनी या मार्गासाठी लाखो झाडांची होणारी कत्तल व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, यासाठी राज्य शासनाने नुकतीच २० हजार कोटीची तरतूद करणे व शेतकऱ्यांच्या विरोध असतांनाही दडपशाही करुन शेतकऱ्यांच्या जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी घेतल्या जाणार असणे, दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील समृध्दी महामार्ग वाहून जाणे, सदर मुसळधार पावसामुळे सोलार पंपासह संपूर्ण सेट, पाईप लाईन, स्प्रिंकलर सेट, केबल इत्यादी वाहून जाणे, सिबिलची अट व ओटीएस ची अट केल्यामुळे बँकेतर्फे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज न मिळणे, तसेच राज्य शासनाने नोकरभरतीमध्ये

कंत्राटी भरती केली असून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने वेतन मिळालेले नसणे, लिपिकाला १२ हजार, शिपायांना १० हजार इतका तुटपुंजा पगार दिला जाऊन एजन्सीला जास्तीत जास्त फायदा कमवून दिला जाणे, राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्य पदी वादग्रस्त कारकीर्द राहिलेले विशेष पोलीस महानिरिक्षक दिलीप भुजबळ यांची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे कामगारांची व बेरोजगारांची फसवणूक केली जात असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**नऊ : (बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ. किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले,**

**सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रिमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतक-यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

दहा : **सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री अजय चौधरी, रोहित पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री अमीन पटेल, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री उत्तमराव जानकर, अस्लम शेख, कैलास घाडगे-पाटील, संदिप क्षिरसागर, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल राऊत, बापूसाहेब पठारे, अमित झनक, संजय पोतनीस, नारायण पाटील, विकास ठाकरे, नितीन देशमुख, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, राजु खरे, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"मागील काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्याने या संस्थांवर प्रशासकाचे नियंत्रण असणे, त्यामुळे राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभुत सुविधांचा बोजवारा उडाला असणे, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मनमानीपणे कारभार सुरु असणे, त्यामुळे या मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य मोबदला मिळत नसल्याने विकासाची अनेक कामे रखडलेली असणे, रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात निविदांची रक्कम वाढविल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन सदरची कामे निकृष्ट दर्जाची झाली असणे, शहरी भागात प्रदुषणाने विळखा घातला असून धुळीचे साम्राज्य, कचऱ्याचे ढिग, नविन बांधकामे होत असताना त्यातून निघणारे डेब्रिज, प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर त्यामुळे शहरी भागात पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, शहरी भागात डंपिंग ग्राऊंडमुळे निर्माण झालेला प्रश्न, डंपिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध नसणे, झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत रखडलेली प्रकरणे, पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयातील रिक्त पदांमुळे व अद्ययावत उपकरणांअभावी रुग्णांना उपचार देण्यात येणाऱ्या अडचणी, स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत शासनाने दाखविलेल्या उदासिनतेमुळे अनेक प्रकल्प रखडलेले असणे, मुंबई महापालिकेच्या के/पश्चिम वॉर्डातील जुहूतारा रोड येथील "सो हो हाऊस" या पंचतारांकित हॉटेलचे बांधकाम करताना कोस्टल रेग्युलेशनचे झालेले उल्लंघन, २ चटईक्षेत्र निर्देशांक मिळत असतांना २.५ जास्त चटई क्षेत्र देऊन दिलेले भोगवटा प्रमाणपत्र, सदर हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात झालेले अनधिकृत बांधकाम, स्थानिक नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारी, माजिवडे (जि. ठाणे) येथील कांदळवन-तिवरे नष्ट करुन रुस्तमजी अर्बेनिया या इमारतीचे झालेले बांधकाम, पर्यावरण कायद्यांचे झालेले उल्लंघन, या इमारतींसमोर अशाच प्रकारचे झालेले अनधिकृत बांधकाम, मुंबईतील वांद्रे (पूर्व) विभागातील रखडलेले पुनर्विकास प्रकल्प, परभणी नगरविकास विभागाच्या अमृत-२ अभियान योजनेंतर्गत येलदरी समांतर पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना, डंपिंग ग्राउंड, डिगी नाला खोलीकरण व रुंदीकरण, भिमनगर येथील अंडरपास रस्ता आणि महापालिका क्षेत्रात नवीन नाट्यगृह बांधणे या विकास कामांच्या प्रस्तावास जुलै, २०२२ ते

जानेवारी, २०२३ दरम्यान राज्यस्तरीय उच्चधिकार समितीने दिलेली मान्यता, सदर प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप उपरोक्त विकास कामांना उपलब्ध न झालेला निधी, निधीअभावी गेल्या २-३ वर्षांपासून सदर योजनांची रखडलेली कामे, ठाणे शहरातील नागरिकांनी क्लस्टर योजनांना केलेला तीव्र विरोध, विरोध डावलून नागरिकांच्या घरांवर त्यांना सुचना न देता नोंदणी क्रमांक टाकण्यात येणे. ठाणे जिल्हा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचा उडलेला बोजवारा, या योजनेत झालेली अनियमितता व भ्रष्टाचार, ठाणे म.न.पा. आणि महसूल विभागात झालेला भ्रष्टाचार, पुणे जिल्ह्यात विविध प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या भुखंड वाटपात झालेला भ्रष्टाचार, राज्यातील देवस्थान इनाम जमिनींची परस्पर विक्री करुन झालेला भ्रष्टाचार, विविध महसूल कायद्यांमध्ये आवश्यक असलेल्या कालबद्ध सुधारणा, नामदेववाडी को-ऑप. सोसायटी, फॉरजेट स्ट्रीट, मुंबई या सोसायटीचा मागील १५ वर्षांपासून रखडलेला पुनर्विकास, बांधकाम कामगार मंडळातील विविध वस्तु वाटपात झालेला भ्रष्टाचार तसेच मंडळाच्या सचिवाची नियमबाह्य केलेली पुनर्नियुक्ती, कोकणातील विकास कामांसाठी गेल्या ३ वर्षापासून न देण्यात आलेला निधी, कोकणात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्लॅनला गेल्या दोन वर्षात न देण्यात आलेली मंजुरी, पावसामुळे नादुरुस्त झालेल्या कोकणातील साकव तसेच पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, तसेच शाळा इमारती, अंगणवाडी इमारती, ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींसाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता, अतिवृष्टीमुळे कोकणात रस्ते खराब होण्याचे प्रमाण अधिक असल्याने रस्त्यांसाठी विशेष निधीची आवश्यकता, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे अत्यंत धिम्या गतीने सुरु असलेले काम, मे, २०२५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे व त्यामुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण, राज्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा ""शक्तीपीठ महामार्ग" बांधण्याची शासनाची योजना, राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणारा सदर महामार्ग, तिर्थक्षेत्रांकडे जाण्यासाठी अगोदरच असलेले रस्त्यांचे जाळे, सदर महामार्गाला राज्यातील जनतेचा असलेला विरोध, तसेच गेल्या काळात राज्याच्या आरोग्य खात्यातील आणखी एक गंभीर प्रकरण उघडकीस येणे, लसींच्या साठवणुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या कोल्ड चेन उपकरणांच्या तब्बल ६२ कोटींच्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येणे, खुल्या बाजारातील किंमतीच्या चार ते पाचपट दरात खरेदी करुन अधिकारी आणि ठेकेदारांनी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे, सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी काढलेल्या RT १४५ क्रमांकाच्या ५६ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत मोठी अनियमितता आणि संगनमत असणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे आणि साहित्याच्या खरेदीत झालेला घोटाळा, जीईएम पोर्टलवर या यंत्राची किंमत सुमारे ४ लाख ४८ हजार रुपये इतकी असणे, हेच यंत्र आरोग्य विभागाने प्रत्येकी सुमारे ६ लाख १० हजार रुपये दराने खरेदी करणे, आरोग्य विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी आणि खनिकर्म विभागातील जिल्हा खनिकर्म अधिकारी व ठेकेदार संस्थेने संगनमताने कुठलीही विहित खरेदी प्रक्रिया राबविली नसल्याचे दिसून येत असून यंत्रसामुग्रीची बाजारातील किंमतीची शहानिशा न करता अधिकच्या दराने खरेदी करण्यात येणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे,

राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पदभरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थींना शुल्क भरण्यात अडचणी येणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करुन अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा. उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करुन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. रईस शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"अनाथ विद्यार्थ्यांना पालक व पालकत्व नसल्यामुळे शिक्षणामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कोणत्याही संस्थेने शिक्षण देण्याकरिता आपला हात पुढे केला असला तरी त्यांना शिक्षणासाठी येणारा खर्च देण्यास शिक्षण संस्थेकडे निधीची कमतरता असल्यामुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, खाजगी मदतीवरच अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च अवलंबून असणे, दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी महिला व बालविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला असणे सदर शासन निर्णयामध्ये अनाथ विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाचे शुल्क भरण्याची तरतूद केलेली नसणे, त्यामुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, अनाथ विद्यार्थ्यांसाठी "थेट शिक्षण शुल्क भरपाई योजना" राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील मुल-मारोडा येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी रुपये ३५ कोटी निधी मंजूर असणे, परंतु इमारत बांधकामासाठी जागेच्या अडचणीमुळे इमारत बांधकामासंदर्भात विलंब होत असणे, सदर जागा वन विभागाच्या नावाने पंजीबद्ध असणे, मुल मारोडा येथे शासकीय कृषी महाविद्यालयासाठी महाविद्यालय इमारत, मुलांचे वसतीगृह, मुलींचे वसतीगृह, संरक्षण भिंत आदींचे बांधकाम करण्याची आवश्यकता असणे, ही जागा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या नावाने हस्तांतरीत करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात अनेक अडचणी असल्याने त्या दूर करून जमीन हस्तांतरणाची कार्यवाही जलदगतीने करण्याची आवश्यकता असणे, सदर सर्व्हे नंबर मोठ्या झाडांचे जंगल व झुडपी जंगल यांच्या नावाने असल्याने निवर्णीकरण करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात महाविद्यालय इमारत बांधकामास विलंब होत असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक ४ व ५)**

**(४) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदाफाटा (ता. कोरपना, जि. चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी

आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे सांडपाणी उघड्या मार्गाद्वारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळ्यात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाड्यांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळ्यात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मे अरबिंदो रियालिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीने प्रकल्पग्रस्तांच्या समस्या न सोडविता गैरकायदेशीरपणे मौजा किलोनी, बेलोरा, जेना, इजीमा १६ रस्ता अवैधरित्या खोदकाम करून शासकीय रस्ता बंद केला असणे, मौजा बेलोरा ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे मे अरबिंदो रियालिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनी कार्यरत असून, उक्त कंपनीला केंद्र सरकारने ९३६ हे.आर. शेत जमीन आवंटीत करणे, परंतू सदर कंपनीने प्रस्तावित शेतजमीनीचे भुसंपादनाचे दर निश्चित न करता तसेच बेलोरा गावाचे पुनर्वसन व प्रकल्प बाधीतांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून न घेता उक्त कंपनीने शासनाव्दारे हस्तांतरीत केलेल्या १२७ हे. आर. शेतजमीनीवर कायद्याचे पालन न करता कंपनी प्रशासनाने अवैध उत्खनन केलेले असणे, कंपनी प्रशासनाने जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत येणारा इजीमा १६ किलोनी, बेलोरा, जेना इ. रस्ता गैरकायदेशीरपणे बंद करून खोदकाम केल्याने शासकीय मालमत्तेचे नुकसान

तसेच सार्वजनिक रस्ता बंद केलेला असणे, प्रकल्पबाधित शेतकरी ग्रामस्थांच्या अनेक मागण्या प्रलंबित असणे, प्रकल्पात प्रस्तावित एकूण ९३६ हे. आर. शेतजमीन एकाच वेळी व एकाच दराने संपादीत करण्यात यावी, प्रस्तावित शेतजमीनीचा दर २५.३० लक्ष इतका निश्चित करण्यात यावा, प्रकल्प बाधितांना किंवा त्यांच्या वारसदारांना प्रकल्पात कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यात यावे, प्रकल्पात नोकरी करण्यास इच्छुक नसणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना एकमुस्त १० लक्ष रूपये एवढे नोकरी ऐवजी अनुदान देण्यात यावे, प्रकल्पात प्रस्तावित बेलोरा गावाचे पुनर्वसन तात्काळ करण्यात यावे तसेच पुनर्वसन मोबदला निश्चीत करण्यात यावे या मागण्या प्रलंबित असणे, या मागण्यासाठी माजी सैनिक श्री. मनोज ठेंगणे यांनी अन्नत्याग आंदोलन करणे, शासनाचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे प्रकल्प बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. प्रविण दटके, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"शासनाच्या महसूल विभागाने नझुलच्या जमिनी फ्री होल्ड केल्या असणे, महापालिकेने आपल्या ताब्यातील जागा २ टक्के निधी आकारून फ्री होल्ड केल्या असणे, त्याच धर्तीवर नागपूर सुधार प्रन्यासने देखील त्यांची मालकी असलेल्या आणि लीजवर नागरिकांना दिलेल्या जागा 'फ्री होल्ड' करण्याबाबत भूखंड धारकांकडून मागणी होत असणे, यामुळे नागपूर शहरातील ५० हजार कुटुंबांना लाभ होणार असल्याने लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी व पाठपुरावा केलेला असणे, मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री यांना लिहिलेल्या पत्रात लोकप्रतिनिधींनी नागपूर शहरातील २ नियोजन प्राधिकरणांच्या वेगवेगळ्या कार्यपध्दतीकडे लक्ष वेधले असणे, 'राज्य सरकारने नझुलच्या जागांची मालकी, जनतेला देण्याचा निर्णय घेतला असणे तसेच महापालिकेनेही निर्णय घेतलेला असताना नागपूर सुधार प्रन्यासबाबतही असा निर्णय करावा अशी होत असलेली मागणी, नागपूरच्या जनतेला मनपाचा मालमत्ता कर आणि नागपूर सुधार प्रन्यासचा भूभाटक कर असे वेगवेगळे कर भरावे लागत असणे, एकाच शहरात २ नियोजन प्राधिकरण असल्याने करांचा गोंधळ होत असणे, नागपूर सुधार प्रन्यासची जमीन भाडेपट्टीवर घेतलेले किमान ५० हजार परिवार नागपुरात असणे, त्यांच्याकडून शासकीय नियमानुसार निधी घेऊन, त्यांचे प्लॉट फ्री होल्ड करून देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. महेश शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात

असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असताना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करुन त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करुन औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## अशासकीय कामकाज

**बारा : अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ९ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.